BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)

An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research

Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

विदर्भातील गोंड समाजातील आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण

घनशाम सखाराम कुळसंगे

संशोधन विद्यार्थी, श्रीमती केशबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती

Email : shamkulsange750@gmail.com

डॉ. प्रशांत काटोले

मार्गदर्शक

प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख

श्रीमती केशबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती

Email : drprashantkatole@gmail.com

प्रस्तावना :

विदर्भ हा भौगोलिक सांस्कृतिक आणि ऐतिहासिकदृष्ट्या महाराष्ट्रातील एक अत्यंत महत्वाचा प्रदेश आहे. या प्रदेशाला समृद्ध जंगले आणि खनिज संपत्तीचे वरदान लागले आहे. याच विदर्भांच्या जंगलामध्ये आणि डोंगराळ भागात शतकानुशतके वास्त्व करणारा गोंड समाज हा येथील प्रमुख आदिवासी समुदाय आहे.

गोंड समाजाला एक गौरवशाली ऐतिहासिक वारसा लाभला असून, एकेकाळी विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली आणि नागपूर या भागावार गोंड राजांचे वैभवशाली राज्य होते. मात्र, काळाच्या ओघात आणि बदलत्या आर्थिक सामाजिक प्रवाहात आज या समाजाची आर्थिक स्थिती अत्यंत आव्हानात्मक बनली आहे.

एकेकाळी जंगलाचे राजे असलेल्या या समाजाची आर्थिक अर्थव्यवस्था पूर्णपणे जल, जंगल आणि जमिनीवर आधारित होती. परंतू आधूनिक काळात झालेले वन कायदे, औद्योगिकीकरण आणि सातत्याने होणारे विस्थापन यामुळे त्यांच्या पारंपारिक उपजिवीकेच्या साधनावर गदा आली आहे. आज विदर्भातील विशेषता: गडचिरोली, चंद्रपूर आणि यवतमाळ या जिल्ह्यामधील गोंड बांधव प्रामुख्याने शेती आणि शेतमजुरीवर अवलंबून आहेत.

1947 पूर्वी (स्वातंत्र्यपूर्व काळात) विदर्भातील गोंड समाजाची आर्थिक परिस्थिती ही प्रामुख्याने जल, जंगल आणि जमिनीतील आधारित स्वावलंबी व्यवस्थेकडून ब्रिटिश राजवटीत झालेल्या तीव्र शोषणाकडे आणि दारिद्र्याकडे झुकणारी होती.

1947 नंतर विदर्भातील गोंड समाजाची आर्थिक परिस्थिती प्रामुख्याने परंपरागत वन-आधारित उपजिविकेपासुन आधुनिक बाजारपेठ, सरकारी योजना आणि संविधानात्मक आरक्षणाच्या प्रभावामुळे मोठ्या स्थित्यंतरातून गेली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात 1947 नंतर जमिनीचे हक्क हिरावले जाणे, जंगल कायद्यामधील कडक निर्बंध आणि औद्योगिकीकरण

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

यामुळे या समाजाला तीव्र आर्थिक आव्हानाचा सामना करावा लागला, गोंड समाजाची आर्थिक रचना समजून घेतांना 1947 हे महत्वाचे विभाजन बिंदू ठरते.

संशोधन विषयाची निवड :

विदर्भ गोंड समाजातील महत्वाचा अभ्यास विषय आहे. गोंड समाजातील बहुतांश लोकांची आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण आणि संशोधन हा एक सामाजिक व आर्थिक दृष्टीकोनातून अत्यंत उपजिविका पारंपारिक शेतीवर अवलंबून आहे. बहुतेकांकडे कोरडवाहू जमीन असून अनेक कूटूंबाकडे स्वत: जमीन नसल्याने ते शेतमजुर म्हणून काम करतात गोंड समाज पारंपारिक हस्तकलेत बांबूकाम आणि लाकडूकाम यामध्ये हा समाज अत्यंत कुशल आहे. मात्र बाजाराअभावी या कौशल्याचे पूर्ण आर्थिक रुंपातर होत नाही.

उत्पन्नाची साधने मर्यादित आणि हंगामी असल्याने हा समाज आर्थिक दृष्ट्या मागासलेला आहे. सावकारी किंवा स्थानिक व्यापाऱ्याकडून घेतलेल्या कर्जामुळे कर्जबाजारीपणाचे प्रमाण अधिक दिसते. विदर्भातील आदिवासी पट्टयात मोठ्या उद्योगाचा अभाव असल्याने स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी कमी आहे, शिक्षणाचा अभाव विशेषत: महिलामध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याने आर्थिक निर्णय घेतांना किंवा नवीन कौशल्ये आत्मसात करताना अडचणी येतात.

विदर्भ गोंड समाजातील आर्थिक परिस्थिती यात बदल घडवून आणण्याचा भाग असल्याने या बदलाचा अभ्यास केवळ शैक्षणिक मूल्याचा नाही तर समाजात आर्थिक परिवर्तन या दृष्टीकोनातून प्रस्तूत संशोधन पेपर उपयुक्त आणि आवश्यक आहे.

संशोधनाची उद्दिष्टये :

1) गोंड समाजाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

2) गोंड समाजाच्या आर्थिक निर्णय प्रक्रियेतील सहभाग अभ्यासणे.

3) शासकीय योजनाव्दारे गोंड समाजावर होणाऱ्या आर्थिक-परिणामाचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :

1) गोंड समाजाची आर्थिक परिस्थिती खालावलेली आहे.

2) शासकीय योजनांच्या लाभांमुळे विदर्भातील गोंड समाजातील आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाली.

3) शासकीय योजनांच्या लाभामुळे गोंड समाजाच्या राहणीमानाच्या दर्जात वाढ झाली आहे.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधानासाठी व्दितीयक आधार सामग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे. व्दितीयक आधार सामग्री ही प्रामुख्याने संदर्भ ग्रंथ, पुस्तके, शासनाचे अहवाल, मासिके दैनिके, वर्तमानपत्रे, व संकेतस्थळावरुन संकलीत करण्यात आलेली आहे.

विश्लेषण

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

विदर्भ हा महाराष्ट्राचा उत्तर पूर्व भागातील एक प्रमुख आणि ऐतिहासिक प्रदेश आहे. ज्यामध्ये नागपूर आणि अमरावती या दोन प्रशासकीय विभागाचा समावेश होतो. विदर्भाचे क्षेत्रफळ सुमारे 97.321 चौरस किलोमीटर आहे. जे महाराष्ट्राच्या एकुण भूभागाच्या 31.6% आहे. विदर्भ महाराष्ट्राच्या एकुण भौगोलिक रचनेत पूर्वकडील पठार भाग म्हणून ओळखला जातो. भारताच्या दृष्टीने पाहता विदर्भ हा देशाच्या पश्चिम मध्य़ भागात आहे.

भारतातील 2011 च्या जणगनेनुसार आदिवासीची (अनुसूचित जमाती ST) एकुण लोकसंख्या 10.43 कोटी असून ती देशाच्या एकुण लोकसंख्येचा 8.6% आहे. भारताच्या संविधानानुसार देशात 700 हून अधिक आदिवासी जमाती आहे. भिल्ल़ आणि गोंड या भारतातील सर्वात मोठ्या आदिवासी समुदायापैकी आहे. आदिवासी समाजातील एकुण 47 जात अनुसूचित जामाती आहे.

महाराष्ट्रातील 2011 च्या जणगणनेनुसार आदिवासीची (अनुसूचित जमाती ST) एकुण लोकसंख्या 1,05,10,213 सुमारे 1 कोटी 5 लाख) इतकी आहे. महाराष्ट्राच्या एकुण लोकसंख्येच्या 9.35% आहे. सर्वाधिक आदिवासी लोकसंख्या असलेले राज्य़ प्रथम मध्यप्रदेश व्दितीय महाराष्ट्र आहे.

नंदूरबार, पालघर, गडचिरोली, नाशिक, ठाणे, धुळे, अमरावती, आणि चंद्रपूर या जिल्ह्यामध्ये आदिवासीची संख्या प्रामुख्याने अधिक आहे. विदर्भात एकुण 11 जिल्हे येतात. विदर्भातील 2011 च्या जणगणनेनुसार आदिवासीची (अनुसूचित जमाती ST) 9 जिल्हयातील एकुण लोकसंख्या 3131905 इतकी आहे. 2011 च्या जणगणनेनुसार नागपूर जिल्हयातील आदिवासीची (अनुसूचित जमाती ST) लोकसंख्या 9.4 आहे. 2011 च्या जणगणनेनुसार वर्धा जिल्हयातील आदिवासीची (अनुसूचित जमाती ST) लोकसंख्या 11.49% आहे.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक जंगल रहिवासी कायदा (वन हक्क़ कायदा) 2006 हा आदिवासी जंगलावर आधारित ज्यांचे जीवन आहे. अशा जनसमूहावर ज्यांच्यावर अन्याय झाला आहे. त्यावर उपाय म्हणून लागू करण्यात आला. जंगलाआधारित जीवन जगणाऱ्या लोकांचे या कायद्यान्वये सुरक्षित करण्यात आलेले अधिकार जोपर्यंत त्यांना मिळत नाहीत तो पर्यंत त्यांना जंगलातून जायला सांगता येणार नाहीत असे हा कायदा सांगतो. शिवाय या लोकांचे जंगल व संसाधनावरील अधिकारही मिळायला हवेत असा हा कायदा सांगतो.

विदर्भातील गोंड समाजाची आर्थिक परिस्थिती प्रामुख्याने शेती, जंगल आणि मजुरी यावर अवलंबून आहे.

1947 पूर्वी (स्वातंत्र्यपूर्व काळ)

विदर्भ गोंड समाजाची आर्थिक परिस्थिती

1947 पूर्वी विदर्भातील गोंड समाजाची आर्थिक परिस्थिती अत्यंत संघर्षाची आणि शोषणाची होती. विदर्भातील गोंड समाजात आर्थिक दृष्ट्या दोन वर्ग होते. एक राजगोंड जे राजे, जमीनदार किंवा गडकिल्यांचे मालक होते. आणि दुसरा वर्ग धुर गोंड जे सामान्य़ जनता, शेतकरी आणि मजूर होते.

विदर्भ गोंड आदिवासी समाज पिढ्यानपिढ्या जंगलात किंवा जंगलाच्या परिसरात राहत आले आहेत त्यांच्या उदरनिर्वाहाची साधने...

जंगलातून पुढील वस्तू गोळा केल्या जात असत.

1) मोहाची फुले आणि बिया

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

2) तेंदूपाने

3) जंगली फळे, कंदमुळे आणि खाद्य वनस्पती

4) मध

5) डिंक

6) आवळा

7) बेहळा

8) बांबू आणि इतर वनस्पती

विदर्भ गोंड आदिवासी समाज या वस्तूंचा वापर अन्न, औषधोपचार आणि उदरनिर्वाहासाठी वापरत असे.

काही उत्पादन जंगलातील वस्तू स्थानिक बाजात विकून किंवा व्यापार देऊन मीठ, तेल, कपडे, आणि इतर जिवना आवश्यक वस्तू मिळविल्या जात असत.

शिकार आणि मासेमारी

विदर्भ गोंड आदिवासी समुहांमध्ये शिकार आणि मासेमारी या पारंपारिक उपजिविकेच्या पध्दती होत्या.

(1) नदी, नाले आणि तलावांतूर मासे पकडणे.

(2) जंगलातील लहान वन्यप्राण्यांची शिकार करणे.

(3) पक्षी आणि इतर उपलब्ध वन्य अन्नस्त्रोतांचा वापर करणे.

या साधनामुळे गोंड आदिवासी कुटूंबाच्या उदरनिर्वाहाची गरज काही प्रमाणात पूर्ण होत असे.

1947 पूर्वी गोंड समाजाची अर्थव्यवस्था मुख्यत: पारंपारिक शेती व जंगालावर आधारित उपजीविकेची अर्थव्यवस्था होती. पारंपारिक शेतीमध्ये ज्वारी, बाजरी, तांदूळ कडधान्ये भाजीपाला विविध स्थानिक पिके घेत असे.

विदर्भातील घनदाट जंगलामध्ये पेंडा किंवा दिप्पी नावाची पारंपारिक स्थलांतरित शेती करत असे, जंगलाच्या काही भाग जाळून तिथे धान्य पिकवले जाई, गोंड समाजाची उपजीविका पूर्णपणे जंगलावर अवलंबून होती ते जंगलातून (मोहफुले) तेंदू पत्ता, चारोळी, मध, डिंक आणि विविध औषधी वनस्पती गोळा करत असत.

स्थानिक पिके यांचे वस्तुविनिमय करण्यासाठी बाजापेठ क्षेत्राचा वापर करित असे आर्थिक संस्था यांचा पूर्वी अत्यल्प प्रवेशासाठी होत असे.

वस्तूविनिमय पध्दती

स्वातंत्र्यपूर्व ग्रामीण अर्थव्यवस्थेत काही ठिकाणी वस्तूविनिमय प्रचलित होता.

(1) धान्याच्या बदल्यात मीठ किंवा तेल घेणे.

(2) वनउत्पादनांच्या बदल्यात दैनंदिन वापराच्या वस्तू मिळवणे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

(3) स्थानिक कारागिरांकडून वस्तू किंवा सेवा घेणे.

विदर्भ गोंड आदिवासी वस्तू विनिमय पध्दतीमुळे जास्त पैशांची कमतरता कमी असलेल्या कुटुंबांना आवश्यक वस्तू मिळवता येत असत.

महिलांचा सहभाग शेती व वनउत्पादनात होत असे, मूलभूत सुविधाची कमतरता पूर्वी आर्थिक परिस्थितीत जीवनमानात अनुभवत असे, वननियंत्रण गरिबी शिक्षणाचा अभाव ही प्रमुख समस्या होती.

1947 नंतर (स्वातंत्र्योतर काळ) विदर्भ गोंड समाजाची आर्थिक परिस्थिती

1947 नंतर आर्थिक परिस्थितीत महत्वपूर्ण संरचनात्मक बदल झाले. संविधानिक सरंक्षण, अनुसूचित जमातीसाठी आरक्षण शिक्षण, सरकारी योजना पायाभूत सुविधा कृषी विकास आणि वनहक्कांच्या कायदेशीर चौकटीमुळे आर्थिक संधी वाढल्या. विकासाचा लाभ सर्व गोंड कुटूंबापर्यंत समान प्रमाणात पोहोचलेला नाही. विशेषत: दुर्गम वनक्षेत्रातील कुटूंबासाठी जमीनहक्क, सिंचन, शेतीची उत्पादकता, लघुवनोपजाचा योग्य बाजारभाव, शिक्षण, कौशल्य आणि स्थानिक रोजगार अजुनही महत्वाचे प्रश्न आहे.

स्वातंत्र्यानंतर ती हळूहळू शेती, वनउत्पादन, शिक्षण, नोकरी, मजुरी आणि व्यवसाय यांचा समावेश असलेल्या मिश्र अर्थव्यवस्थेत रुपांतरित झाली.

शैक्षणिक आणि नोकरीतील प्रगती :

भारतीय संविधानातील कलम 342 अंतर्गत गोंड समाजाला अनुसूचित जमाती (ST) चा दर्जा मिळाला. सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणामधील आरक्षणामुळे विदर्भातील गोंड समाजातील पहिल्या व दुसऱ्या पिढीने उच्च शिक्षण पूर्ण केले.

1947 नंतर विदर्भातील गोंड समाजात महिला आर्थिक सक्षमीकरण बचतगट निर्माण करुन त्यांना रोजगार निर्माण करुन देण्यात आले. खाद्यप्रक्रिया, मोहफुल प्रक्रिया, मसाले, बांबू उत्पादन, कापड, हस्तकला, शेळीपालन, कुक्कुटपालन या रोजगार निर्मितीचा उपयोग दैनदिन जीवनात करित असे.

गोंड समाजाची आजची आर्थिक परिस्थिती :

आज गोंड समाजाची आर्थिक स्थिती मिश्र स्वरुपाची आहे. आदिवासी समाज कुठपर्यंत समोर आलेला आहे.

आर्थिक दृष्टया पुढे आलेला वर्ग काही कुटूंब

(1) उच्चशिक्षित आहेत (2) सरकारी नोकरी (3) शहरामध्ये स्थायिक

(4) व्यवसाय (5) आधुनिक शेती (6) राजकीय प्रशासकीय क्षेत्र

मध्यम आर्थिक इतर काही कुटूंब

(1) स्वत:ची शेती , (2) पशुधन, (3) घर, (4) सरकारी योजनाचा लाभ, (5) मुलांचे शिक्षण

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

आर्थिक दुर्बल वर्ग काही कुटूंब

(1) अल्पभूधारक (2) भूमिहिन किंवा जमीन हक्काच्या प्रक्रियेत

(3) जंगलातील उत्पन्नावर अवलंबून (4) हंगामी मजुरी करणारी

(5) स्थलांतरित मजुरी करणारी

आज सर्व गोंड समाज गरीब आहे, किंवा सर्व गोंड समाज आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला आहे असे म्हणणे योग्य़ नाही.

1947 मध्ये भारताला स्वातंत्र्य़ मिळाल्यानंतर आणि पुढे भारतीय राज्य़घटनेच्या अंमलबजावणीनंतर गोंड समाजाच्या आर्थिक रचनेत कायदेशीर व संस्थात्मक़ बदल झाले.

आर्थिक घटक	1947 पूर्वीची स्थिती	1947 नंतर
जमिनीची मालकी	सावकार आणि ब्रिटीश धोरणामुळे मोठ्या प्रमाणावर जमिनी गमावल्या समाज भूमिहीन झाला.	जमीन सुधारणा कायदे आले. आदिवासीची जमीन बिगर आदिवासींना हस्तांतरित करण्यास बंदी घालणारे कायदे करण्यात आले.
उदरनिर्वाह साधन	केवळ पारंपारिक शेती, शिकार आणि जंगलातून कंदमुळे गोळा करणे.	व्यापारीकरण व मजुरी मध, महुआ, तेंदू पत्ता गोळा करुन त्यांची विक्री करणे हा मुख्य़ व्यवसाय बनला.
कायदेशीर हक्क़	जंगलात प्रवेश बंदी आणि वन गुन्हेगार म्हणून ब्रिटीश सरकार कडून छळ.	पेसा आणि वन हक्क़ कायदा 2006 या कायद्यामुळे गोंड समाजाला जंगलातील गौण वनोपजावर Minor Forest Produce मालकी हक्क़ मिळाला.
रोजगार व शिक्षण	आधुनिक शिक्षणाचा अभाव, साक्षरता दर अत्यंत कमी अंदाजे 7 टक्के च्या आसपास.	आरक्षण व सरकारी नोकऱ्या राज्यघटनेत अनुसूचित जमाती ST अंतर्गत समाविष्ट केल्याने शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षण मिळाले.

निष्कर्ष

1) काही कुटूंबाकडे असलेली शेती ही कोरडवाहू डोंगराळ आणि कमी सुपीक आहे. सिंचनाच्या सोयीचा अभाव आणि आधूनिक तंत्रज्ञानाचा कमी वापर यामुळे शेतीतून मिळणारे उत्पन्न अत्यंत कमी आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

2) मोहफुले, चारोळी, तेंदुपत्ता, मध, डिंक आणि बांबू यांसारख्या दुसऱ्या वनोपजाची उत्पन्नाचा एक मुख्य़ साधन आहे.

3) शेतीचा हंगाम संपल्यावर उत्पन्नाचे साधन नसल्याने मोठ्या प्रमाणावर हंगामी स्थलांतर करावे लागते.

4) विदर्भातील गोंड कलाकारामध्ये कौशल्य़ असूनही त्यांचे व्यावसायिकरण न झाल्यामुळे आर्थिक स्थैर्य मिळू शकले नाही.

5) गोंड समाजातील युवकांच्या कला गुणांना वाव देऊन आर्थिक सुधारणा आणता येते.

उपाययोजना

1) पशुधन विकास योजनातून आर्थिक परिस्थिती सुधरविल्या येते.

2) शेतीसाठी विशेष अनुदान योजनाचा वापर करुन शेतीमध्ये यांत्रिक सुधारणा करता येते.

3) वनहक्क़ योजना 2006 याचा वापर करुन ववनोपजकावर आर्थिक सुधारणा करणे.

4) आदिवासी युवक स्व़-रोजगार योजना यामध्ये युवकाच्या कौशल्य़ गुणांनाचा वाव देऊन आर्थिक सुधारणा घडवून आणणे.

संदर्भ ग्रंथ सूची

इंग्रजी

1) Wankhade Dipak, "Level of Socio Economic Development of Tribal Population in Vidharbha", Lap Academic Reprient listing 11, Vol. Nov. 2012.

2) Ghurye G.S., "The Scheduled Tribes", Popular Prakashan Bombay, Third Edition, 1995.

3) Deoganonkar Gopal Shashishekhore, "The Gonds of Vidharbha", Concept Publishing Comapany, 2007.

4) Banarjee Biswatit, "Rurall to Urban Migecson and the Urban laboure Market", Himalaya Publishing House, Nagpur, 1986.

मराठी

1) घोडे गुरूनाथ, "भारतीय आदिवासी", कॉन्विक नॅशनल पब्लिकेशन, पुणे.

2) बडवे महेश मो., (संपा.) "आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचे अध्ययन, आदिवासी समाज : संस्कृती आणि आरोग्य", अथर्व पब्लिकेशन, जळगांव, २०१७.

3) बुरंगे राजेश उल्हासराव, "आदिवासी क्षेत्राचा आरोग्य दर्जा", नाथे पब्लिकेशन, नागपूर, २०१०.

4) रायटर डी.व्ही., (संपा.), "आदिवासी शिक्षण आणि आरोग्य, आदिवासी समाज : संस्कृती आणि आरोग्य", अथर्व पब्लिकेशन, जळगांव, २०१७.

5) पाटील जया विश्वनाथ, "यशाची परिक्रमा", मासिक पृथ्वी पब्लिकेशन, पुणे.

6) वर्मा संजीव, "द इंडियन इकॉनोमिक्स", युनिक पब्लिकेशन, नवी दिल्ली, २०२३.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

7) भांडारकर पु.ल., "सामाजिक संशोधन पद्धती", महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, औरंगाबाद, १९९९.

8) बोधनकर सुधीर, "सामाजिक संशोधन पद्धती", साईनाथ पब्लिकेशन, पुणे.

9) गायकवाड बी.आर., "महाराष्ट्राचा आर्थिक विकास एक चिंतन", चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २०१२.

हिंदी

1) केदार प्रसाद मीणा, "आदिवासी समाज साहित्य और राजनीती", अनुज्ञा बुक्स, दिल्ली, २०१६.

2) शुक्ला आर.एस., "फारस्ट्री फॉर ट्रायबल", डेवलपमेंट व्हिलर्स पब्लिकेशन्स, नई दिल्ली, २०००

3) अवस्थी राजेंद्र, "हमारे आदिवासी", मुंबई पब्लिकेशन्स, मुंबई, १९६२.

4) नरेशकुमार, "जनजातीय विकास", रावत पब्लिकेशन्स, नागपूर, २००३.